खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित

मुलींचे वसतिगृह ( मु.जे.परिसर )

सन 2012-13 चा वार्षिक अहवाल

---

मू.जे.महाविद्यालयाच्या परिसरातील मुलींच्या वसतिगृहात अहवाल वर्षात मू.जे.महाविद्यालयाच्या एकुण 199 विद्यार्थीनी व एकुण 8 प्राध्यापिका वास्तव्यास होत्या.

दि.03/08/12 रोजी मानसशास्त्र या विषयावर डॉ देव यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

दि.26/08/12 रोजी आर्ट ऑफ लिव्हींग बाबत व्याख्यान आयोजित करण्यात आले.

मुलींच्या वसतिगृहामध्ये 19 सप्टेबंर 2012 ते 29 सप्टेंबर 2012 या कालावधी मध्ये गणेशोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.या कालावधीमध्ये वसतिगृहात रोज रात्री 7 ते 10 या वेळेत मनोरंजनात्मक व मुलींच्या कलागुणांना वाव देणा-या स्पर्धा घेण्यात आल्या.त्यात विजयी झालेल्या विद्यार्थीनींना पारितोषिके देण्यात आली.

दि.23 सप्टेंबर 2012 रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

दि. 27 सप्टेबंर2012 या दिवशी वसतिगृहाचे स्नेहसंमेलन “जल्लोष 2012“ मोठया उत्साहात पार पडले.

दि.16/10/12 ते 24/10/12 या कालावधीत वसतिगृहात नवरात्री निमित्त गरबा व दांडीयाचे आयोजन करण्यात आले.

राजधानी दिल्ली येथे युवतीवर झालेल्या अत्याचाराविरोधात वसतिगृहातील सर्व विद्यार्थीनींनी दि.16 डिसेबंर 2012 रोजी वसतिगृह ते जिल्हापेठ पोलीस स्टेशन जळगाव पर्यंत कॅन्डल मार्च काढला.

दि.29/10/12 रोजी कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यात आली.या दिवशी दुध वाटप करण्यात आले.

दि.01/02/13 ते दि.15/02/13 या कालावधीमध्ये वसतिगृहातील मुलींच्या डोळयांची तपासणी करण्यात आली.

वसतिगृहातील मेस सोसायटी चालवित आहे. वसतिगृहातील मुलींना उच्च प्रतीचे, जीवन सत्व युक्त जेवण देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. मेस मधील अडीअडचणी सोडविण्यासाठी भोजनसमिती सदस्यांची निवड विद्यार्थीनीमधुन करण्यात येते .समिती सदस्यांची वेळोवेळी बैठक घेण्यात येते.

मेसमध्ये मुलींना गरम जेवण मिळावे यासाठी बेनमेरी बसविण्यात आली आहे. तसेच अन्न व्यवस्थित शिजावे म्हणुन Boiler बसविण्यात आले आहे.

मुलींच्या बाहेर येण्याजाण्यावर त्यांना भेटणा-यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तीन शिप्टमध्ये सुरक्षा रक्षकाची नेमणुक करण्यात आली आहे त्याबाबत नोंद ठेवण्यात येते.

श्री.संजीव पाटील

मुलींचे वसतिगृह प्रमुख